ARTHA, Pooan 4

उद्योगधंदे, बँकिंग,
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
प्रमुख मराठी
वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

*“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

प्रत्येक महिन्याच्या
पहिल्या व तिसऱ्या
बुधवारीं
प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, ५ ऑगस्ट, १९६४ | अंक १५

SCG-I HIN

# नहीं—
# यह कोई साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



नवल सोडा वाटर यंत्र | घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ४०८१२

# विविध माहिती

**वापरांत नसलेलें अतिथिगृह**—सरकारी खात्यांचा एक-मेकांशीं मेळ नसल्यामुळें कसा अनवस्था प्रसंग ओढवतो ह्याचें एक उदाहरण केरळचे मुख्यमंत्री श्री. शंकर ह्यांनीं स्वत:च सांगितलें आहे. केरळ राज्यांत त्रिचूरजवळ एक अतिथिगृह बांधण्यांत आलें आहे. त्यांच्या बांधकामासाठी एक लाख रुपयावर खर्च झाला आहे; परंतु गेल्या ४ वर्षांत तें वापरण्यांत आलेलें नाहीं. कारण, गृहांत वीज व सांडपाणी ह्यांची सोय अद्याप झालेली नाहीं.

**विजेच्या उत्पादनाची जबाबदारी**—भारतामधील विजेच्या उत्पादनाची जबाबदारी सध्यापेक्षा अधिक प्रमाणांत मध्यवर्ती सरकारला घेतां येईल कीं नाहीं ह्याविषयीं नियोजन समितींत चर्चा करण्यांत येणार आहे. हा प्रश्न निर्माण होण्यास दोन कारणें आहेत. एक असें कीं, वीज-निर्मितीच्या योजनांना येणारे खर्च आवाढव्य असतात आणि त्यामुळें राज्य सरकारांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम होतो. दुसरें असें कीं, राज्यसरकारांनीं मध्यवर्ती सरकारला द्यावयाचीं देणीं वाढत चाललीं आहेत.

**सुताची सहकारी गिरणी**—यवतमाळ येथें १ कोटी रुपये भांडवलाची सुताची सहकारी गिरणी उभारण्यांत येणार आहे. ह्या कामीं प्रगतिपर शेतकरी, सहकारी संस्था आणि सहकारी खातें ह्यांनीं पुढाकार घेतला आहे. गिरणीसाठी भारत सरकारनें १२हजार चात्यांचा परवाना दिला आहे. ह्या भागांतील ५ हजार शेतकऱ्यांनीं मिळून आतांपर्यंत ६ लाख, ८८ हजार रुपयांचें भांडवल जमविलें आहे. प्रारंभीं २५ लाख रुपयांचें भांडवल उभारण्याचें ठरलें आहे.

**अमेरिकेचें पाकिस्तानला कर्ज**—अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय विकास मंडळानें पाकिस्तानला ६० लाख डॉलर्सचें अथवा ३ कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. पाणी-पुरवठा आणि वीजनिर्मिति ह्या कामासाठी कर्जाचा उपयोग करण्यांत यावयाचा आहे. कर्जाची मुदत ४० वर्षांची असून त्याची फेड डॉलर्सच्या चलनांत करावयाची आहे. कर्जफेडीसाठी आणखी १० वर्षांची सवलतीची मुदत ठेवण्यांत आली आहे.

**संततिप्रतिबंधक औषध**—संतती होण्यास प्रतिबंध करणारें पोटांत घ्यावयाचें एक औषध जपानमध्यें शोधून काढण्यांत आलें आहे. ह्या औषधाच्या परिणामाचा ८ महिनेपर्यंत अभ्यास करण्यांत आल्यावर तें १०० टक्के गुणकारी असल्याचें आढळून आलें आहे. तथापि, तें बाजारपेठेंत विकण्यापूर्वी त्याच्या वापरावर जपानचें आरोग्यखातें कांहीं बंधनें घालणार आहे.

**पाकिस्तानच्या कापसाचें गिऱ्हाईक**—१९६३-६४ सालांत कम्युनिस्ट चीननें पाकिस्तानकडून सर्वांत अधिक म्हणजे ३ लाखांवर गांसड्या कापूस विकत घेतला. रशिआनें मात्र पाकिस्तानकडून ह्या वर्षीं कापूस विकत घेतला नाहीं. ब्रिटनची कापसाची खरेदी ७ हजार गांसड्यांपासून ४० हजार गांसड्यांपर्यंत वाढली.

**योगविद्येचा रशिअन शिष्य**—उत्तर ध्रुव प्रदेशांत बर्फ फोडून बोटींना मार्ग करून देणारी लेनिन ह्या अणुशक्तिचलित बोटीचा मुख्य एंजिनिअर मागे भारताला येऊन गेलेला आहे. तो योगासनांचा अभिमानी आहे. भारताच्या बोटीवरील एका कप्तानाकडून त्यानें कांहीं आसनें शिकून घेतलीं, आणि तेव्हांपासून तो तीं नियमितपणें करीत आहे. ह्या रशिअन एंजिनिअरची पाठ सतत २० वर्षें दुखत असे. पण योगासनांच्या नियमित अभ्यासानें त्याचा हा विकार पूर्णपणें बरा झाला आहे.

**राजस्थानांतील भूमिहीन शेतकरी**—राजस्थानांतील भूमिहीन शेतकऱ्यांचें पुनर्वसन करण्याचे उपाय सुचविण्यासाठी राज्य-सरकारनें एका बोर्डाची स्थापना केली आहे. राज्यांत असलेल्या पडिक जमिनीची ह्या दृष्टीनें पहाणी करण्यांत येत आहे. भूमिहीनांच्या पुनर्वसनासाठी भारत सरकारनें निरनिराळ्या राज्यांना मिळून ७ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

**कालिदासाच्या स्मृतीसाठी अध्यासन**—पंजाब विद्यापीठानें चालू शैक्षणिक वर्षापासून महाकवि कालिदासाच्या स्मृतीप्रीत्यर्थ कालिदास अध्यासन चालू केलें आहे. ह्या अध्यासनासाठी राज्य सरकारनें २० हजार रुपयांची देणगी मंजूर केली आहे.

**मोटारींच्या उद्योगधंद्याला कर्ज**—जागतिक बँकेनें हिंदमधील मोटारी तयार करण्याच्या धंद्यासाठी १९६४-६५ सालांत ४·७ कोटी डॉलर्सचें कर्ज अलीकडेच दिलें असून त्याचा उपयोग नीट करण्यांत आला तर आणखी इतकीच रक्कम पुढील वर्षींहि देण्यांत येणार आहे. उद्योगधंद्याला देण्यांत आलेल्या कर्जापैकीं १·११ कोटी डॉलर्स एवढी रक्कम उद्योगधंद्याला पूरक अशा धंद्यांना देण्यांत येणार आहे. ह्या कर्जाचा उपयोग उतारू वाहून नेणाऱ्या मोटारी तयार करण्यासाठी मात्र करता येणार नाहीं.

**हिंदी बोलपटाचें यश**—बर्लिन येथें भरविण्यांत आलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट-महोत्सवांत 'महानगर' ह्या चित्रपटाला दिग्दर्शनाबद्दल ठेवलेलें पाहिलें बक्षीस मिळालें आहे. हा चित्रपट सुप्रसिद्ध बंगाली दिग्दर्शक श्री. सत्यजित रे ह्यांनीं तयार केलेला आहे. चित्रपटाची कथा मोठ्या शहरांतील एका मध्यमवर्गीय कुटुंबांतील आर्थिक समस्येवर आधारलेली आहे. स्त्रियांनीं घराबाहेर काम करून अर्थार्जन करण्याचा प्रश्न कथेंत गोवला आहे.

**कोटा येथील कारखाना**—रशिआच्या मदतीनें राजस्थानांतील कोटा येथें सूक्ष्म हत्यारांचा एक कारखाना काढण्यांत यावयाचा आहे. ह्यासंबंधीं झालेल्या कराराप्रमाणें रशिआ भारताला ६१६ टन वजनाची यंत्रसामग्री पुरविणार आहे. तिची किंमत सुमारें १३३·७ लाख रुपये होईल. त्याशिवाय १२० हिंदी तंत्रज्ञांना रशियांत शिक्षण देण्यांत येणार आहे.

**इंग्लिश स्त्री सेक्रेटरींची स्पर्धा**—व्यवस्थित काम करणाऱ्या व ठसक्यांत बोलणाऱ्या इंग्लिश स्त्री-चिटणिसांनीं अमेरिकेच्या मजूर खात्यापुढें कांहींसा अडचणीचा प्रश्न उभा केला आहे. न्यूयॉर्क शहरांतच अशा ३,००० स्त्रिया अमेरिकन कंपन्यांतून काम करीत आहेत. सेक्रेटरींच्या नोकऱ्या ह्या मुलींनीं पटकावल्यामुळें अमेरिकन मुलींना हीं कामें मिळण्यास अडचण पडत आहे, असा अमेरिकन सरकारचा ग्रह झाला आहे. म्हणून अधिक इंग्लिश तरुणींना हीं कामें करण्यासाठी अमेरिकेंत येण्याची मना करण्यांत आली आहे.

**शेंगदाण्याच्या तेलाची पुनर्निर्यात**—धान्य, तांदूळ व तेलबिया व्यापारी संघटनेचे उपाध्यक्ष श्री. देवजी रतनसी ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, भारताकडून ब्रह्मदेशाला निर्यात करण्यांत येणाऱ्या बहुतेक शेंगदाण्याची तेलाची निर्यात ब्रह्मदेश पुन्हां चीनला करीत आहे. ह्या वर्षीं भारतानें ब्रह्मदेशाला २५ हजार टन तेल निर्यात केलें आहे. हें तेल ब्रह्मदेशाच्या नेहमींच्या गरजेपेक्षा दुप्पट आहे. खुद्द ब्रह्मदेशांत शेंगदाण्याचें उत्पादन वाढलेलें आहे. तरीसुद्धां शेंगदाण्याच्या तेलाची ब्रह्मदेशाची आयात वाजवीपेक्षा अधिक वाटते.

# अर्थ

बुधवार, ५ ऑगस्ट, १९६४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## निरक्षरता नाहींशी करण्याचा कार्यक्रम

स्वतंत्र भारतांत शिक्षणाचा प्रसार जसजसा वाढत आहे तसतसें निरक्षरतेचें प्रमाणहि कमी होत चाललें आहे. तरी पण ह्या बाबतींत अद्याप बरीच वाटचाल करावयाची आहे असें दिसून येतें. साक्षरतेचा प्रसार करण्यासाठी लागणारा खर्च मोठा असल्या-मुळें हळुहळु गाठतां येणारीं उद्दिष्टें ठरविण्यांत येणार आहेत. अशा टप्प्यांनीं काम करून सहाव्या पंचवार्षिक कार्यक्रमाअखेर भारतामधील निरक्षरता पूर्णपणें नाहींशी करण्याचा उद्देश साधला जावयाचा आहे. सध्यां ह्या बाबतची परिस्थिति अशी आहे. भारताची सध्यांची लोकसंख्या सुमारें ४९·२ कोटी आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस ह्यांपैकी १४ ते १५ वर्षे वयाच्या गटांत असलेले २० कोटी लोक तरी निरक्षरच राहतील असा अंदाज करण्यांत आला आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ५ कोटी लोकांना साक्षर करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत येण्याचा संभव आहे. ह्या कामासाठी ९० कोटी रुपये खर्चावे लागतील. साक्षरता वाढविण्यासाठी दोन बाजूंनीं प्रयत्न करण्यांत येणार आहेत. देशांतील प्राथमिक शाळांची संख्या वाढविणें ही एक बाजू झाली. तथापि जे वयस्कर लोक निरक्षर राहिलेले आहेत त्यांना साक्षर करण्याचेहि प्रयत्न होणार आहेत. ही दुसरी बाजू झाली. साक्षरता वाढविण्याच्या कामीं राज्य-सरकारांना भरपूर मदत देण्यांत यावी आणि राज्यसरकारांनीं आपल्या शिक्षणविषयक कार्यक्रमांत साक्षरतेच्या प्रसाराला प्राधान्य द्यावें असें सुचविण्यांत येत आहे. मध्यवर्ती सरकार ह्या कामासाठी लागणाऱ्या खर्चाचा मुख्य बोजा उचलणार असले तरी साक्षरतेच्या कार्यक्रमाची संघटना, त्याची व्यवस्थायंत्रणा, वाचनालयें, साक्षरांसाठी योग्य असें वाङ्मय, ह्यांची जबाबदारी राज्यसरकारांनाच उचलावी लागेल असें दिसतें.

## विदर्भांतील मँगेनीझच्या खाणी संकटांत

विदर्भांतील मँगेनीझच्या खाणी संकटांत सांपडल्या आहेत. ह्या भागांत ३५८ खाणी असून त्यांपैकी २८७ खाणी बंद करण्यांत आल्या आहेत. कारण त्या चालविणें परवडण्यासारखें राहिलेलें नाहीं. मँगेनीझ धातूच्या निर्यातींत घट झाली असून किंमतीहि घसरल्या आहेत. त्यामुळें ही परिस्थिति उद्भवली आहे. १९६२ मध्यें ह्या भागांतील खाणींमधून सुमारें ७,६४,०००टन मँगेनीझचें खनिज काढण्यांत आलें होतें. १९६३ सालीं उत्पादनाचा आकडा ७,४४,००० टनांवर आला आहे. खाणी चालविण्यासाठी देण्यांत आलेल्या परवान्यांचें नूतनीकरण करण्याच्या बाबतींत सरकारचें धोरण खाणी–मालकांना उत्तेजक वाटत नाहीं. परवान्यांचें नूतनी-करण करण्याच्या बाबतींत सरकारचें धोरण अनिच्छेचें दिसत आहे. ज्या परवान्यांची मुदत संपेल त्या खाणी शक्य तर सार्व-जनिक मालकीच्या करून चालविण्याचा सरकारचा इरादा आहे. चालू वर्षअखेर मँगेनीझच्या ऐनजिनसी बदलाचे व्यवहार खाजगी करूं देण्याचें बंद करण्याचा विचार चालू आहे. तसें करण्याचें ठरल्यास उत्पादनांत आणखीहि घट होण्याची शक्यता आहे. भारतांत उत्पादन करण्यांत येणाऱ्या मँगेनीझचा उत्पादनाचा खर्च, वाहतूक आणि निरनिराळे सरकारी कर लक्षांत घेतां जागतिक बाजारपेठेंत भारताचें मँगेनीझ रोख किंमत देऊन घेणारीं गिऱ्हाइकें फारशीं मिळणार नाहींत असा खाण–मालकांचा अंदाज आहे. गेल्या मार्चमध्यें ह्या धातूच्या ऐनजिनसी बदल्याचा एक करार अमेरिकेशीं करण्यांत आला आहे. त्यांतील अटीप्रमाणें अमेरिका भारताला लांब धाग्याचा कापूस पुरविणार असून त्याच्या बदला मँगेनीझ घेणार आहे.

## पिकांच्या रक्षणासाठी कीडनाशक औषधें

पावसापाण्याच्या लहरीवर बव्हंशी अवलंबून असल्यानें भारता-मधील शेतीच्या भरभराटीची ग्वाही देतां येत नाहीं. त्यांतच पिकां-वर पडणाऱ्या किडीची भर पडल्यावर तर अनिश्चितता अधिकच वाढते. शेतांतील उभ्या पिकांवर रोगराई पडल्यानें हिंदमध्यें दर-साल सुमारें ८० लाख टन अन्नधान्याची नासाडी होते; त्याशिवाय २० ते २५ लाख अन्नधान्य सांठवणुकीच्या अयोग्य व्यवस्थेमुळें वाया जातें. इतकें अन्नधान्य वाया जाण्याचें थांबविण्यांत आल्यास भारत अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण होण्याची शक्यता आहे. शिवाय तसें झाल्यास धान्याच्या आयातीवर खर्च करण्यांत येणाऱ्या परदेशीय चलनाचीहि बचत होईल. पिकांवर पडणाऱ्या किडीचा अभ्यास करणाऱ्या एका गटानें असें सुचविलें आहे कीं कीडनाशक द्रव्यांचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढविण्यांत आलें पाहिजे. कारण ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १६ कोटी एकर जमिनीवरील वृक्षवनस्पती किडीपासून वांचविण्याचें ठरविण्यांत आलेलें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत हें उद्दिष्ट ४·५ कोटी एकरांपुरतेंच मर्यादित करण्यांत आलें आहे. पिकांवर औषधी द्रव्यांचा फवारा मारण्यासाठी भारत सरकारनें आणखी ८ विमा-नांची व्यवस्था करण्याचें ठरविलें आहे. रासायनिक आणि तज्जन्य पदार्थांची निर्यात वाढविण्यासाठी एक निर्यात-मंडळ स्थापन कर-ण्यांत आलें आहे. पिकांवर मारण्यासाठी कीडनाशक औषधें निर्माण केलीं तर त्या द्रव्यांना ब्रह्मदेश, सयाम, लेबॅनॉन ह्या देशांतून चांगली मागणी येईल असें मंडळाला आढळून आलें आहे. सध्यां हे देश त्यांच्या गरजा ब्रिटन, अमेरिका, जपान, इत्यादि देशांच्या द्वारां भागवतात. ही गरज भारतानें पुरी केल्यास पर-देशीय चलन मिळण्याचा आणखी एक मार्गहि उपलब्ध होईल.

## नाशिक जि. म. सहकारी बँकेची लखमापूर शाखा

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. च्या लखमापूर [ता. बागलाण] शाखेचें उद्घाटन गुरुवार दि. ३० जुलै रोजीं बँकेचे चेअरमन माननीय श्री. नरहर कारभारी ठाकरे ह्यांच्या हस्तें झालें. बँकेची ही ३७ वी शाखा आहे.

## जननाचें प्रमाण घटविण्यास अधिक मदत पाहिजे

झपाट्यानें वाढणाऱ्या लोकसंख्येच्या कठीण प्रश्नानें भारतापुढील अडचणींची तीव्रताहि वाढत चाललेली आहे. लोकसंख्येच्या वाढीला आळा घालण्याचें काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांची एक परिषद् दिल्ली येथें भरविण्यांत आली होती. दरवर्षी २५ लाख जननक्षम स्त्री-पुरुषांचें निर्बिजीकरण साध्य करावयाचें असेल तर भारत सरकारनें ह्या कामासाठी १०० टक्के मदत दिली पाहिजे असें मत परिषदेंत व्यक्त करण्यांत आलें. जननाचें प्रमाण घटविण्यासाठी निर्बिजीकरण करणें एवढाच परिणामकारक उपाय आहे, असा अभिप्राय नमूद करण्यांत आला आहे. संततिनियमनाच्या प्रश्नाचा विविध अंगांनीं अभ्यास करण्यासाठी निरनिराळे गट करण्यांत आले होते. अभ्यास गटांनीं केलेल्या विचारविनिमयावरून असें दिसून आलें कीं येत्या १०वर्षांच्या कालांत जननक्षमता ५० टक्क्यांनीं घटवावयाची असल्यास निर्बिजीकरणाचा अवलंब केलाच पाहिजे. त्याचप्रमाणें सध्याचा भ्रूणहत्त्याविषयक कायदा थोडासा सैल करण्याची आवश्यकता दिसून आली. परिषदेंतील बहुमत असे आढळून आले की तीन मुलें झाल्यानंतर भ्रूणहत्येला कायद्यानें परवानगी देण्यांत यावी. मात्र त्याच वेळीं पुरुषानें अगर स्त्रीनें वंध्यत्वप्राप्तीची शस्त्रक्रिया करून घेण्याची सक्ति असावी. प्रत्येक जिल्ह्यांत पुरुषावरील शस्त्रक्रियेची माहिती देणारें एक फिरतें केंद्र असावें अशी शिफारस परिषदेनें केली आहे. सध्यां भारतांत खरी संततिप्रतिबंधक साधनांचा खप वाढत चाललेला आहे. गेल्या तीन वर्षांत अशा प्रकारचीं ४ कोटी साधनें दरसाल बाजारांत आणण्यांत आलीं. ह्या बाबतींतील आंकड्यावरून असें दिसतें कीं गेल्या आठ वर्षांत ह्या साधनांची मागणी ५ पटीनें वाढलेली आहे.

## बिडाच्या लोखंडाच्या आयातींत वाढ

ओतकामासाठी लागणाऱ्या बिडाच्या लोखंडाचा तुटवडा भासत असल्यामुळें भारत सरकार येत्या तीन वर्षांच्या कालांत दरसाल १॥ लाख टन कच्चें लोखंड आयात करण्याचा विचार करीत आहे. बोकॅरो येथे काढण्यांत यावयाच्या पोलादाच्या कारखान्याच्या उभारणीला वेळ लागत आहे. त्यामुळें लोखंडाच्या पुरवठ्याची परिस्थिति अधिकच तंग झालेली आहे. लोखंडाचें उत्पादन वाढविण्यासाठी कांहीं खाजगी कारखानदारांना परवाने देण्यांत आले होते, परंतु त्यांच्याकडून ह्या बाबतींत फारशी प्रगति झालेली नाहीं. १९६४ सालासाठी भारत आणि रशिया ह्यांच्यांत जो व्यापारी करार करण्यांत आला आहे त्यांत रशियाकडून लोखंड आयात करण्याचें ठरविण्यांत आले आहे. त्याशिवाय देशांतील उत्पादन वाढविण्याचे प्रयत्नहि करण्यांत येत आहेत. चौथा पंचवार्षिक कार्यक्रम सुरू होण्यापूर्वीच दुर्गापूर येथील पोलादाच्या कारखान्यांत ५ वी झोतभट्टी उभारण्याचें आणि भिलई येथें ६ वी झोतभट्टी उभारण्याचें काम त्वरेनें करण्यांत येत आहे. त्याशिवाय सार्वजनिक मालकीच्या विभागांत आणखी झोतभट्ट्या उभारण्याचाहि विचार चालू आहे. ह्या बाबतींत सल्ला देणारे तज्ज्ञ १२ जागांची पहाणी करीत आहेत. त्यांतील तीन ठिकाणें निवडण्यांत येऊन तेथें भट्ट्यांची उभारणी करण्यांत येईल. खाजगी कारखानदारांना भट्ट्या उभारणीसाठी दिलेले परवाने फारसे उपयोगी ठरले नाहींत. ह्याचें कारण असें सांगण्यांत येत आहे कीं, ह्या भट्ट्या छोट्या असल्यामुळें त्या आर्थिक दृष्ट्या परवडण्यासारख्या नाहींत. खाजगी कारखान्यांना दिलेले परवाने १ लाख टन लोखंडाच्या भट्ट्याचें होते. परंतु आतां ३ लाख टन उत्पादन करणाऱ्या भट्ट्या उभारण्याची परवानगी देण्यांत आली आहे.

## परदेशीय प्रवाशांपासून मिळणारे उत्पन्न

अप्रगत देशांना औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी प्रगत देशांच्या परदेशीय चलनांतील भांडवलाची गरज असते. देशांतील मालाची निर्यात करून अगर कर्जें घेऊन ही गरज भागविण्याचे प्रयत्न भारतासारखे मागासलेले देश करीत असतातच; पण परदेशीय हौशी प्रवाशांना भारतांत आकर्षित करूनहि परदेशीय चालनाची प्राप्ति होत असते. एका दृष्टीनें ह्या मार्गानें झालेली प्राप्ति अधिक लाभदायक म्हटली पाहिजे. कारण, भारतांत आलेल्या परदेशीय पाहुण्यांमुळें त्या त्या देशांशीं अधिक जवळचे संबंध निर्माण करण्यास मदत होते. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत परदेशीय चलनाच्या प्राप्तींत चांगली वाढ होण्याची शक्यता आहे. हौशी प्रवासी भारतांतील प्रेक्षणीय स्थळें पहाण्यासाठी येतात आणि त्यांच्यापासून दरसाल सरासरी १६.७ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळत असतें. चौथ्या कार्यक्रमांत ह्या बाबीपासून मिळणारा उत्पन्नाचा आकडा सरासरी २३ कोटींपर्यंत जाईल असा अंदाज आहे. अमेरिका, ब्रिटन व पश्चिम यूरोप ह्या ठिकाणांहून येणाऱ्या प्रवाशांच्या उत्पन्नांत वाढ होणार आहे. परदेशाहून भारताला येण्याबाबत जी बंधनें आहेत तीं शिथिल होण्याचा संभव आहे. भेट देण्यासारखा देश म्हणून भारताची प्रसिद्धीहि अधिक चांगली करण्यांत येणार आहे; आणि परदेशीय प्रवाशांच्या सुखसोयींकडेहि अधिक लक्ष पुरविण्यांत येणार आहे. भारताला परदेशीय प्रवाशांपासून होणाऱ्या प्राप्तींत ५५ टक्के हिस्सा अमेरिकेचा आहे. त्यानंतर ब्रिटनकडून १५ ते १८ टक्के व पश्चिम युरोपांतील देशांकडून १२ ते १५ टक्के प्राप्ति होते. २५ टक्के प्राप्ति ब्रह्मदेश, मलेशिआ, सीलोन व एडन ह्या पौंडांच्या विभागांतील देशांकडून होते.

## शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ ह्यांचा अधिक चांगला उपयोग

शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधन मंडळानें देशांतील शास्त्रज्ञांच्या व तंत्रज्ञांच्या ज्ञानाचा उपयोग कसा व किती प्रमाणांत करून घेण्यांत येतो ह्यासंबंधीं पहाणी केली आहे. पहाणीवरून असें दिसून आलें कीं, औद्योगिक आणि शास्त्रीय क्षेत्रांत ह्या लोकांचा जो उपयोग करण्यांत येतो त्यांत बदल घडवून आणला पाहिजे. शास्त्रीय अगर तांत्रिक ज्ञान असलेल्या लोकांपैकी दोनतृतीआंश लोक सध्या सरकारी संघटनांत अगर सार्वजनिक मालकीच्या विभागांत काम करीत आहेत. खाजगी मालकीच्या विभागांत काम करणाऱ्या एंजिनिअरिंगच्या पदवीधरांचें प्रमाण १० टक्क्यांच्या आसपास आहे, तर रसायनशास्त्रांतील एंजिनिअराबाबत हे प्रमाण ४५ टक्के आहे. पदवीनंतरचा अभ्यासक्रम पार पाडलेल्या शास्त्रांपैकी फक्त ५ टक्के शास्त्रज्ञ खाजगी मालकीच्या विभागांत काम करीत आहेत. बाकीचे सरकारी संघटनांतून अगर इतर शैक्षणिक संस्थांतून काम करीत आहेत. ह्यावरून असा निष्कर्ष काढण्यांत आला आला आहे कीं, औद्योगिक क्षेत्रांत शास्त्रज्ञांना अगर एंजिनिअर्सना फारसा वाव मिळत नाहीं. त्यामुळें प्रत्यक्ष औद्योगिक उत्पादनाला त्यांची मदत पर्यायानेंच होते. ह्याच्यापेक्षा अगदीं वेगळी परिस्थिति अमेरिकेंत आहे. तेथें ४० टक्के शास्त्रज्ञ आणि ६० टक्के एंजिनिअर्स औद्योगिक कारखान्यांतून काम करीत आहेत. देशाच्या औद्योगिक व आर्थिक क्षेत्रांत माणसें कामावर घेण्याची जी पद्धत आहे तींत बदल करून शास्त्रीय ज्ञानाचा व तांत्रिक कौशल्याचा अधिक चांगला वापर करण्यांत आला पाहिजे असें सुचविण्यांत आलें आहे.

## महाराष्ट्रीय उद्योगपति, श्री. पदमजी ह्यांचें निधन

मुंबवा येथील डेक्कन पेपर मिल्सचे श्री. फर्दुनजी पदमजी हे वयाच्या ९४ व्या वर्षी गेल्या आठवड्यांत मृत्यु पावले. सुप्रसिद्ध सरदार पदमजी घराण्यांतले ते एक सुपुत्र होते. प्रत्येक छापखान्यांत जाऊन आपल्या कागदाचे नमुने दाखवून ते खपविण्याचा त्यांचा क्रम कित्येकांना आठवत असेल; आपल्या कागदाच्या गिरणीचे द्वारां अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत त्यांनीं स्वदेशीच्या चळवळीस प्रत्यक्ष कृतीनें हातभार लावला. महाराष्ट्रांतील प्रत्येक नव्या उद्योगाला त्यांनीं मनोभावानें मदत केली आहे; कुणीहि प्रवर्तक त्यांचेकडे शेअर्स विकण्यासाठी गेला, तरी त्याला त्याच्या अपेक्षेपेक्षा जास्त रकमेचा चेक मिळत असे. नव्या महाराष्ट्रीय कंपन्यांचे त्यांनीं लक्षावधि रुपयांचे शेअर्स आस्थेवाईकपणें, कर्तव्यबुद्धीनें घेतले. महाराष्ट्र बँकेचे ते एक संस्थापक–संचालक होते. त्यांच्या गिरणीला ओव्हरड्राफ्ट लागे, त्याला भरपूर तारण तर असेच, पण ते महाराष्ट्र बँकेला पूर्वीच्या बँकेपेक्षा एक टक्का जास्त व्याज आपण होऊन देत असत; त्यामुळें त्यांच्या ह्या जादा व्याजांतून बँकेला प्रारंभापासून डिव्हिडंड देतां आले. प्रारंभीं वसूल भागभांडवल थोडें असल्यामुळें हें सहज शक्य झालें; बँकेची प्रतिष्ठा वाढून तिचा धंदा वाढायला मोठीच मदत झाली. पुढें एका वर्षी बँकेच्या वार्षिक सभेंत निवृत्त होणाऱ्या संचालकांना विरोध करून निवडून येण्यासाठी कांहीं सभासद उभे राहिले. वास्तविक, निवृत्त होणारे संचालक बहुमतानें निवडून आले असते पण निवडणुकीची अनिष्ट प्रथा टाळण्यासाठी त्यांची निवृत्त होण्याची पाळी नव्हती तरी राजीनामा देऊन नव्या उमेदवाराला बिनविरोध येण्यास जागा करून दिली. संचालकांच्या पुढच्याच सभेंत पदमजी शेठना पुनः बोर्डावर घेण्यांत आलें. पारशी समाजांतला हा खानदानी गृहस्थ महाराष्ट्राशीं पूर्णपणें एकरूप झालेला होता; त्यांचें सौजन्य, आगत–स्वागत, परोपकारबुद्धि, कर्तव्यनिष्ठा, ह्यांची छाप परिचितांवर पडल्याविना राहात नसे. पुणें येथील महाराष्ट्रीय मंडळाला त्यांनीं एक देणगी जाहीर केली आणि त्यानंतर कांहीं महिन्यांनीं देणगीचा चेक पाठवला. दोन तारखांमधील मुदतीचें त्या रकमेवरील व्याज त्या चेकमध्यें त्यांनीं समाविष्ट केलें होतें. " महाराष्ट्रीय मंडळाचे पैसे मी वापरलें, त्याचें हें व्याज " असा त्यांनीं खुलासा केला. ही एकच गोष्ट त्यांच्या थोरवीची कल्पना देईल.

---

### देसाई बँक अवॉर्डची मुदतवाढ

भारत सरकारने देसाई अवॉर्डची मुदत एका वर्षाने वाढविली आहे. ती ३० जुलै रोजीं संपत होती. अवॉर्डची मुदत वाढविण्यांत आली असली, तरी योग्य गाऱ्हाण्यांची दाद घेतली जाईल, असें सरकारनें ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज् असोसिएशनला कळविले आहे. तीन वर्षें अवॉर्डची कमाल मुदत असूं शकते, ती आतां जुलै, १९६५ अखेर संपेल. स्टेट बँकेसकट शेड्यूल्ड बँकांचे ८०,००० नोकर त्यांत समाविष्ट आहेत.

## बँकेच्या ठेवीवरील व्याजाचे दर वाढणार

### २·५ कोटी रु. जादा खर्च

बँकांच्या ठेवींवरील व्याजाचे दर वाढणार असून ते बहुधा १७ ऑगस्टपासून अंमलांत येतील. ह्या संबंधांतील भाभा कमिटीच्या सर्व शिफारसी मान्य करण्यांत आल्या आहेत; फक्त कॉलमनीवरील व्याजाचा दर $2\frac{1}{2}$% ऐवजी ३% करण्यांत येईल. इंडियन बँक्स असोसिएशनच्या सभासद असलेल्या एक्सचेंज बँकांनींहि शिफारसींना मान्यता दर्शविली आहे. तीन चतुर्थांश बँकांचा होकार येताच मूळ करारांत दुरुस्ती करण्यांत येईल; बहुतेक बँकांनीं ह्यापूर्वीच आपला होकार कळविला आहे. व्याजाच्या ह्या दरवाढीमुळें सर्व बँकांना मिळून सुमारें २·५ कोटी रु. ज्यास्त व्याज द्यावे लागेल. हे व्याज परवडण्यासाठी उत्पन्न कसें वाढवावें, असा प्रश्न बँकांपुढें उभा राहाणार आहे. कर्जावरील व्याजाचे दर वाढू देण्यास रिझर्व्ह बँकेची तयारी असणार नाहीं, तर सर्व्हिस चार्जेस वाढविण्यास असोसिएशनच्या कांहीं प्रमुख बँका तयार नाहींत.

---

### हिंदी बोलपटांची निर्यात

हिंदी बोलपटांची परदेशांतील निर्यात वाढविण्यासाठी एका मंडळाची स्थापना करण्यांत आलेली आहे. निर्यातीसाठी परदेशांत पाठविलेल्या बोलपटांच्या वितरणाचें कामहि मंडळ करणार आहे. मंडळानें अमेरिकेंतील चित्रगृहांतून दाखविण्यासाठी ६ चित्रपटांची निवड केलेली आहे. पूर्व युरोपांतील देशांतून दाखविण्यासाठी आणखी ६ चित्रपट निवडण्यांत आले आहेत. भारतीय चित्रपटांची परदेशीं निर्यात करून सध्यां १·७ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळतें. चित्रपटाच्या धंदाचें देशांतील वट्ट उत्पन्न दरसाल ५० कोटी रुपयांचें आहे. हें उत्पन्न दरसाल निर्माण करण्यांत येणाऱ्या ३०० चित्रपटांपासून मिळते. देशांतर्गत उत्पन्नाशीं तुलना करता परदेशांतील उत्पन्न अगदींच किरकोळ आहे. अर्थात्, बोलपटांची निर्यात अधिक वाढविण्याची आवश्यकता आहे.

---

### रिझर्व्ह बँकेच्या द्वाराशीं यक्षयुग्म

दिल्ली येथील रिझर्व्ह बँकेच्या इमारतीच्या प्रवेशद्वाराशीं यक्ष व यक्षिणीचे दोन मोठे दगडी पुतळे स्थापन करण्यांत येणार आहेत. पुराणांतील कथेप्रमाणें 'कुबेर' हा धनाधिपति देव असून त्याचें रक्षण यक्षयक्षिणीचें एक युग्म करीत असतें. सध्यांच्या युगांतील धनाधिपति अर्थातच रिझर्व्ह बँक होय. हे पुतळे उभारण्यासाठी ·३ लाख रुपये खर्च येणार आहे. गेले सहा महिने बँकेच्या आवारांतच पुतळे घडविण्याचें काम चालूं आहे. येत्या नोव्हेंबरमध्यें बहुधा ते उभारण्यांत येतील. पुतळ्यांची उंची २१ फूट असून त्यांच्या दगडी बैठकीची उंचीच १० फूट असेल. प्रवेशद्वारापाशीं उभारण्यांत यावयाच्या पुतळ्यांनीं बँकेच्या इमारतीची शोभा वृद्धिंगत होणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**कॅन्सराविषयक संशोधन केंद्र**—कॅन्सर ह्या रोगासंबंधी संशोधन करणारें एक केंद्र आणि त्या रोगावर उपचार करणारें एक इस्पितळ नागपूर येथें स्थापन करण्यांत येणार आहे. नागपूरमध्यें दरमहा ६० लोकांना ह्या रोगाची बाधा झालेले आढळून येते. ह्या संस्थेच्या स्थापनेसाठी एक कमिटीची संघटना करण्यांत आली आहे. कमिटीनें ह्या कामासाठी १० लाख रुपये जमविण्याचें ठरविलें आहे.

**पश्चिम जर्मनीचें भारताला कर्ज**—पश्चिम जर्मनीनें भारताला ४ कोटी मार्कस् म्हणजे सुमारें ३६ लाख पौंडांचें विकास कर्ज दिलें आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून भारतानें जर्मनीकडून २५ प्रकारचा माल घ्यावयाचा आहे. मालांत मुख्यत: औद्योगिक यंत्रसामग्रीचा समावेश आहे. पश्चिम जर्मनीनें भारताला एकूण ३९.८ कोटी मार्कसूचें कर्ज देण्याचें कबूल केलें होते. त्यांपैकीं हा पहिला हप्ता आहे.

**आतबट्ट्याचा विमानमार्ग**—इंडिअन एअर लाइन्स कॉर्पोरेशननें दिल्ली–मद्रास ह्या प्रमुख विमानमार्गावर फ्रान्सकडून आणलेली 'कारव्हेल' विमाने वापरण्यास प्रारंभ केला आहे. परंतु ह्या मार्गावर प्रवास करणाऱ्यांची संख्या पुरेशी नसल्यानें विमान कंपनीला तोटा सहन करावा लागत आहे. ह्या मार्गावरील वहातूक नव्या विमानांच्या साह्यानें सुरू झाल्यापासून ४ महिन्यांत कॉर्पोरेशनला १० लाख रुपयांपेक्षा अधिक तोटा सहन करावा लागला आहे.

**भांडवल गुंतविण्याला आकर्षक वातावरण**—भारताचे व्यापारमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं न्यूयॉर्क येथें अमेरिकन उद्योगपतींना उद्देशून भाषण केलें. भाषणाला ७५ उद्योगपती हजर होते. खाजगी उद्योगधंद्यांकडे संशयानें पाहण्याचें धोरण भारतानें आतां सोडून दिलेलें असल्यामुळें परदेशीय भांडवलाला आकर्षण वाटेल असें वातावरण उत्पन्न झालेलें आहे, असें त्यांनीं सांगितलें.

**अणुशक्तीवर चालणारी प्रवासी बोट**—अणुशक्तीच्या साह्यानें प्रवास करणारी पहिली आगबोट अमेरिकेनें पांच वर्षांपूर्वी समुद्रांत सोडली. तिच्या सर्व प्रकारच्या चांचण्या आतां पुऱ्या झाल्या आहेत. ह्या बोटीला ३॥ वर्षें प्रवास करण्यासाठी अवघे ६९० पौंड आण्विक इंधन लागेल. अटलांटिक सागर एकदा ओलांडण्यास ह्या बोटीला १। पौंड इंधन पुरते. हा प्रवास ३ हजार मैलांचा आहे.

**गोव्याचा औद्योगिक विकास**—गोव्यांतील ग्रामीण विभागांत उद्योगधंद्यांचा विकास करण्याची योजना गोवा सरकारनें मंजूर केली आहे. ती अमलांत आणण्यासाठी १० लाख रुपये खर्च येणार आहे. गोव्यांत कांहीं खास उद्योगधंद्यांचें शिक्षण देणारीं केंद्रें उघडण्यांत येणार आहेत. त्यांत मोटारींचें यांत्रिक शिक्षण आणि वर्कशॉप ह्यांची सोय करण्यांत येईल. त्याशिवाय सुतारकामाचें आणि चामड्याच्या वस्तू तयार करण्याचें शिक्षणहि देण्यांत येणार आहे.

**अधिक गतीचें रशिआचें विमान**—ब्रिटन व फ्रान्स ध्वनिपेक्षाहि अधिक गतीनें चालणारे मोठे प्रवासी विमान बांधण्याच्या खटपटींत आहेत हे महशूर आहे. रशिआहि असें विमान बांधण्याच्या प्रयत्नांत असून त्याचा वेग ब्रिटन-फ्रान्सच्या विमानांपेक्षांहि अधिक असणार आहे. अशा प्रकारचें विमान प्रथम कोण बांधतो ह्यासंबंधीं चुरस आहे. परंतु स्पर्धकांपैकीं कोणीहि फारसा पुढें जाण्याचा संभव नाहीं.


दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ – पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर–**

| | | | |
|---|---|---|---|
| चालू ठेव | ... | ... | १¼ टक्के |
| सेव्हिंग्ज | ... | ... | २ टक्के |

**कायम ठेव–**

| | | | |
|---|---|---|---|
| १ महिना | ... | ... | २.३७ टक्के |
| ३ महिने | ... | ... | ३.५० टक्के |
| ६ महिने | ... | ... | ३.७५ टक्के |
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षें | ... | ... | ४.२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ... | ... | ४.५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*
*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.

# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

: मुख्य कचेरी :
९, बेंक हाऊस लेन, फोर्ट मुंबई.
टेलिफोन नं. २५५४७४–७५,
२५६२१४

: विभागीय कचेरी :
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता :
फार्मर बँक

: बृहन्मुंबईतील शाखा :
(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ४ कोटी ७५ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ४१ लाख |
| ठेवी | ... | २१ कोटी ६३ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ६७ कोटी ८७ लाख |

**महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

**संरक्षण निधीच्या रकमा या बँकेंत स्वीकारल्या जातात.**

## पर्सनल प्रेस सर्व्हिसचा रौप्यमहोत्सव



### श्री. नारायणराव ठाकूर ह्यांची कामगिरी

नियतकालिकांतील इष्ट विषयांच्या माहितीचीं कात्रणें पुरविणाऱ्या पर्सनल प्रेस सर्व्हिसचा, म्हणजेच श्री. नारायण तुकाराम ठाकूर, बी. ए. ( ऑनर्स ) ह्यांच्या नावीन्यपूर्ण, स्वतंत्र व्यवसायाचा रौप्यमहोत्सव महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक ह्यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच थाटानें साजरा झाला. श्री. नानासाहेब ठाकूर ह्यांनीं "अनेक अडचणींना तोंड देऊन आणि वैयक्तिक आर्थिक हानीकडे लक्ष न देतां सेवेचें कंकण बांधून पर्सनल प्रेस सर्व्हिस चिकाटीनें चालविल्यामुळें या संस्थेनें देशांत मानाचें स्थान मिळविलें आहे" असें रौप्य-महोत्सवाच्या कार्यकारी समितीच्या निवेदनांत म्हटलें आहे, त्याची प्रचीति म्हणजे राष्ट्राध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् ह्यांची समारंभाचे अध्यक्षपदीं समितीनें केलेली मूळ योजना. आधीं त्यांची स्वतःची नादुरुस्त प्रकृति आणि त्यानंतर नाजूक राजकीय परिस्थिति, ह्यामुळें त्यांचे इकडे प्रत्यक्ष येणें जमलें नाहीं, असें समजतें. पर्सनल प्रेस सर्व्हिसच्या कात्रणांचा लाभ महात्मा गांधी, महर्षि अण्णासाहेब कर्वे, डॉ. जयकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, श्री. श्रीप्रकाश, इत्यादि विविध पक्षांतील आणि क्षेत्रांतील लोकाग्रणींना मिळालेला आहे. त्याचप्रमाणें, अनेक लहान-मोठे उद्योगपती, पर्सनल प्रेस सर्व्हिसचे ग्राहक आहेत. सर्व्हिसचा संसार वाढत असून मराठी-इंग्रजीप्रमाणें हिंदी, गुजराती, संस्कृत, कानडी, इत्यादि भाषांतीलहि कात्रणें तिच्यामार्फत पाठविलीं जात आहेत. प्रस्तुत महोत्सवामुळें श्री. नानासाहेब ठाकूर ह्यांच्या अपूर्व कामगिरीचा जनतेला परिचय होईल इतकेंच नव्हे तर नवे नवे आर्थिक मार्ग आक्रमण्यास पुष्कळांना चालना मिळेल, असा विश्वास आहे.

---

## नॅशनल बँक ऑफ पाकिस्तान
### पीपल्स क्रेडिट खातें

दि नॅशनल बँक ऑफ पाकिस्ताननें १९६३ सालीं ९१ नव्या कचेऱ्या उघडल्या; म्हणजे तिच्या आतां ३३० कचेऱ्या झाल्या आहेत. बँकेला २·२९ कोटी रु. नफा झाला. बँकेकडे १६२ कोटी रु. च्या ठेवी होत्या. बँकेनें १०८ कोटी रु. चीं कर्जें दिलीं होतीं. बँकेच्या पटावर ९,६९९ नोकर आहेत. बँकेच्या पीपल्स क्रेडिट खात्याचा उद्देश मध्यमवर्गीयांना आर्थिक मदत करणें, हा आहे. ३१ मार्च, १९६४ अखेर बँकेनें एकूण ५,७२३ कर्जदारांना ५·९४ कोटी रु. चीं कर्जें मंजूर केलीं. त्यांपैकी २·६५ कोटी रु. चीं कर्जें प्रत्येकी १०,००० रु. खालील होतीं आणि तीं मिळणाऱ्या कर्जदारांची संख्या एकूण कर्जदारांच्या ७०% होती.

## रशियाचे प्रमुख कर्जदार
### भारत, इंडोनेशिया, अफगाणिस्तान, इजिप्त, घाना, क्यूबा.

रशिया आपल्या परराष्ट्रांना केलेल्या मदतीचे आकडे अमेरिका-ग्रेटब्रिटनप्रमाणें प्रसिद्ध करीत नाहीं. पाश्चात्य देशांच्या अंदाजाप्रमाणें, १९५९ ते १९६२ ह्या मुदतींत कम्युनिस्ट गटाबाहेरील देशांना रशियानें २३०० कोटी रुपयांचीं कर्जें आणि १२५ कोटी रुपयांच्या देणग्या दिल्या. त्यांपैकी फक्त ७५० कोटी रुपयांचाच प्रत्यक्ष वापर केला गेला. कर्जांपैकी ४६% कर्जें आशियांतील देशांना, २५% कर्जें मध्यपूर्वेतील देशांना आणि बाकीचीं बहुतेक कर्जें आफ्रिकेंतील आणि लॅटिन अमेरिकेंतील देशांना देण्यांत आलीं. प्रत्यक्ष वापरलेल्या कर्जांचा हिशेब केला, तर आशियाचा वाटा ६१% आणि मध्यपूर्वेचा वाटा २२% पडतो.

आशियांतील कर्जदारांत भारत, इंडोनेशिया आणि अफगाणिस्तान हे देश प्रमुख आहेत. मध्यपूर्वेतील कर्जदारांत इजिप्त अग्रेसर आहे; त्यानंतर इराक आणि सिरियाचा क्रम लागतो. घाना, गिनी, इथिओपिया आणि माली हे आफ्रिकेंतील प्रमुख कर्जदार आहेत; आतां अल्जेरियालाहि जास्त प्रमाणावर कर्जें देण्यांत येत आहेत. लॅटिन अमेरिकेंतील मुख्य कर्जदाराला म्हणजे क्यूबाला मदत खूपच वाढली आहे, त्यामुळेंच लॅटिन अमेरिकेचा हिस्सा वाढलेला दिसतो.

---

## मद्रासजवळ निघावयाचा तेलशुद्धीचा कारखाना

मद्रासजवळ काढण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्यासाठी सहकार्य देण्याची तयारी ११ देशांनी दाखविली आहे. अगदीं अलीकडे कारखाना उभारण्याच्या कामी इराण व कुवेतच्या सरकारांनी आस्था दाखविली आहे. कोणाचे सहकार्य घ्यावयाचे ह्या संबंधीचा निर्णय ऑगस्ट अखेर घेण्यांत येईल. त्यानंतर पावसाळ्याची अखेर झाल्यावर उभारणीच्या कामाला प्रारंभ करण्यांत येईल. १९६० च्या मध्याच्या सुमारास उभारणीचे काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. दरम्यान कावेरी नदीच्या खोऱ्यांत तेलाच्या शोधाचें काम पावसाळ्यानंतर सुरू करण्यांत येणार आहे. हें काम हिंदी तंत्रज्ञच करणार आहेत. कावेरीच्या खोऱ्यांत तेल सापडण्याची शक्यता आहे. परंतु तेल न सापडतां नैसर्गिक वायूचा आढळ झाला तरी तो स्वागतार्हच मानला जाईल. मात्र तो व्यापारी दृष्टीनें पुरेशा प्रमाणांत सांपडला पाहिजे.

---

## जत्रांमधील धर्मप्रचार

पुणें येथील नॅशनल ख्रिश्चन युनिअन ह्या संघटनेनें ख्रिस्ती लोकांना आणि धर्मोपदेशकांना अशी सूचना केली आहे कीं, त्यांनीं जत्रेसारख्या इतर धर्मांच्या ठिकाणीं ख्रिश्चन धर्माचा प्रचार करू नये. भारतामधील निधर्मी लोकशाहीच्या हिताच्या दृष्टीनें ख्रिश्चन धर्माव्यतिरिक्त इतर धर्मांच्या लोकांच्या भावना अशा प्रकारच्या प्रचाराने दुखविणें इष्ट नाहीं असा ठराव संघटनेनें मंजूर केला आहे. पंढरपूर सारख्या ठिकाणी ख्रिश्चन मिशनरी धर्माचा प्रसार करतांना दिसून येतात. त्यामुळें इतर धर्मांच्या लोकांच्या मनांत ख्रिस्ती धर्माविषयी आणि त्याच्या उपदेशकांविषयी विनाकारण गैरसमजुती पसरतात आणि असंतोष उद्भवतो असे संघटनेला आढळून आलें आहे.

### केळ्यांच्या निर्यातीसाठी कॉर्पोरेशन

दक्षिण भारतामधील चार राज्यांनीं केळीं व इतर फळें ह्यांच्या लागवडीसाठी आणि निर्यातीसाठी संयुक्तपणें एका कॉर्पोरेशनची स्थापना केली आहे. कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल १ कोटी रुपयांचें आहे. त्याचा भरणा चारीं राज्यें सारख्या हिश्श्यानें करणार आहेत. म्हैसूर सरकारनें एकूण १,२७,५०० रुपयांचें भाग भांडवल घेतलें आहे. कॉर्पोरेशनची मुख्य कचेरी मद्रास येथें राहणार आहे. केळीं निर्यात करण्याचे प्रयत्न महाराष्ट्रांतील सहकारी संघटनांतर्फेंहि होत आहेत. परंतु ती टिकवावी कशी हा प्रश्न अद्याप समाधानकारक रीतीनें सुटलेला नाहीं. तो सुटल्या-शिवाय निर्यातींत खोट येण्याचा संभवच अधिक आहे.

### समृद्धि आणि टंचाई ह्यांमधील अंतर

कलकत्ता शहरांत अलीकडे माशांची अतिशय टंचाई पडली असून माशांचा व्यापार सरकारच्या नियंत्रणाखालीं आणण्याचे प्रयत्न फारसे यशस्वी झालेले नाहींत. त्यामुळें नागरिकांना वाजवी किंमतींत मासे मिळत नाहींत. पण कलकत्त्यापासून अवघ्या ३० मैलांवर असलेल्या कॅनिंग ह्या ठिकाणीं एक प्रकारचा चविष्ट मासा विपुल आढळून आला. ह्या माशांची पैदास निसर्गाच्या कांहीं चमत्कारांनीं इतकी झाली कीं, स्थानिक रहिवाशांना मासे खाऊन त्यांचा वीट आला. लोकांनीं हें समुद्रजन्य अन्न भरपूर खाऊन उरलेले मासे परत पाण्यांत फेकून दिले. कलकत्ता शहरांतील सामान्य लोक महागाईच्या वा टंचाईच्या तडाख्यानें हैराण झाले असतांना अवघ्या ३० मैलांवर खाद्यपदार्थांची असलेली समृद्धि पश्चिम बंगाल सरकारला मात्र उशिरा कळली.

### कामगारांच्या वर्गणीनें इस्पितळ

श्रीरामपूर–नेवासें रस्त्यावर साखर कारखान्यांतील कामगारांनीं वर्गणी उभारून ६० खाटांचें एक इस्पितळ बांधण्याचें ठरवून त्याप्रमाणें कामास प्रारंभ केला होता. इस्पितळासाठी लागणारी वर्गणी टिळकनगर आणि हरेगांव येथील कामगारांनीं जमविली. कामगारांनीं जमविलेल्या २ लाख रुपये रकमेचा उपयोग इमारत बांधण्यासाठी करण्यांत आला. इमारत आतां पुरी होत आली आहे. तथापि, वैद्यकीय साधनसामग्री व औषधें ह्यांच्या खरेदीसाठी अद्याप २·५ लाख रुपये रकमेची आवश्यकता आहे. ही रक्कम उभी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडे खटपट करण्यांत येत आहे. शिवाय खाजगी रीत्याहि पैसा उभारण्याचे प्रयत्न चालू आहेत. ह्या प्रयत्नांना यश आल्यावरच इस्पितळाचें काम मार्गाला लागेल.


### अमेरिकेच्या खाजगी भांडवलाची गुंतवणूक

न्यूयॉर्क येथील वॉल स्ट्रीट जर्नल ह्या नियतकालिकाच्या दिल्लीमधील वार्ताहरानें भारतामधील खाजगी भांडवलाच्या गुंतवणुकीविषयीं लेख लिहिला आहे. लेखकानें आपल्या लेखांत असें सांगितलें आहे कीं, खाजगी मालकीचें भांडवल गुंतविण्यास लागणारी परिस्थिति भारतांत झपाट्यानें सुधारत आहे, इतकेच नव्हे तर ह्यामुळें भारताला फायदाहि होऊं लागल्याचा पुरावा दिसून येत आहे. मध्यवर्ती सरकारच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याचा हवाला देऊन लेखकाने भारताला येत्या दोन वर्षांच्या काळांत ३० कोटी डॉलर्स अथवा १५० कोटी रुपयांच्या भांडवलाची जरूरी आहे अशी माहिती दिली आहे. सरकारी पातळीवरून देण्यांत येणाऱ्या मदतीबाहेर, खाजगी क्षेत्रांत, इतक्या भांडवलाची आवश्यकता आहे.





बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
क्रुगभाट, मुंबई ४.
शाखाः ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग


तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्

विजय पंपींग सेट
शेतीकरिता मजबूत व कार्यक्षम
विजय पंप सेट वापरा
न्यू विजय इंडस्ट्रीज लि. विश्रामबाग, सांगली
१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.
– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

**कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामग्री**—कोईमतूर येथील लक्ष्मी मशीन वर्क्स ही कंपनी कापड गिरण्यांना लागणारी सर्व प्रकारची आधुनिक पद्धतीची यंत्रसामग्री तयार करणार आहे. कंपनीचा कारखाना कोईमतूरपासून ११ मैलांवर स्थापन करण्यात येणार आहे. तो काढण्याच्या कामीं कंपनीला एका प्रख्यात स्विस कंपनीचे सहकार्य लाभले आहे. कारखान्याला लागणाऱ्या यंत्र सामग्रीची आयात करण्यासाठी इंटर नॅशनल फायनॅन्स कॉर्पोरेशन कंपनीला कर्जाच्या व भांडवलाच्या रूपानें मदत देणार आहे.

**डिझेल तेलावर चालणारी रेल्वे एंजिने**—वाराणसी येथील रेल्वे एंजिनांच्या कारखान्यांत डिझेल तेलावर चालणारी एंजिने तयार करण्याच्या कामी प्रगती होत आहे. कारखान्यांत बहुतांशी हिंदी बनावटीचें पहिलें एंजिन नुकतेच तयार करण्यांत आले आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अशी ८३ एंजिनें तयार करण्यांत येणार आहेत, त्यापैकी हे एक आहे. १९६७-६८ च्या सुमारास सुमारें १५० एंजिनें तयार होऊं लागतील. ह्या एंजिनां-तील ९० टक्के भाग देशांत निर्माण करण्यांत आलेले असतील.

**झेकोस्लोव्हाकिआंतील प्रदर्शन**—येत्या सप्टेंबर महिन्यांत झेकोस्लोव्हाकिआंत एक आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनांत भारतामधील ३०० कंपन्या भाग घेणार आहेत. त्यांच्या दालनांनीं १ हजार चौरस मीटर जागा व्यापली जाईल. ह्या प्रदर्शनांत भारत पहिल्यानेंच भाग घेत आहे. यांत्रिक हत्यारें, रासायनिक आणि अन्नपदार्थांच्या धंद्याला लागणारे साहित्य, एंजिनिअरिंगचा माल, इत्यादी प्रदर्शनांत मांडण्यांत येणार आहे. प्रदर्शनांत एक माहिती केंद्र आणि वाचनालयहि खोलण्यांत येणार आहे.

**विमानानें कीडनाशक फवारे**—मध्यप्रदेशांतील एका जिल्ह्यांतील कापसाच्या पिकाचे किडीपासून रक्षण करण्यासाठी विमानाच्या सहाय्यानें औषधी फवारे उडविण्यांत येणार आहेत. ह्या जिल्ह्यांतील ५ हजार एकरांतील पिकांवर कीडनाशक औषधें मारण्याचे ठरविण्यांत आले होते. पण त्याहिपेक्षा आधिक म्हणजे १० हजार एकरांतील पिकांना ह्या योजनेचा फायदा मिळणार आहे.

**ह्या महर्गतेचे कारण काय?**—गेल्या वर्षांत अन्नधान्याच्या व जरूरीच्या इतर वस्तूंच्या किमती भलतीकडे चढल्या आहेत. रिझर्व्ह बँकेने मालाच्या तारणावर यावयाच्या कर्जावर कितीहि निर्बंध घातले तरी त्याचा परिणाम किमती उतरण्यात होत नाहीं. दिल्लींतील मंत्र्यांच्या गटांतील मत असें आहे कीं बिनहिशेबी काळ्या पैशाची ही करामत आहे. भारतात निदान ५०० कोटी रुपये तरी अंधारांत गडप झालेले आहेत असे म्हणतात. ह्यावर उपाय म्हणून चलनी नोटा रद्द करण्याचे सुचविण्यात येते. पण ह्या उपायाला आंतरराष्ट्रीय नाणे-निधी आक्षेप घेण्याचा दाट संभव आहे.

**हस्तव्यवसाच्या मालाला वाढती मागणी**—न्यूयॉर्कमध्यें भरविण्यांत आलेल्या जागतिक प्रदर्शनांत भारतानें मांडलेल्या हस्तव्यवसायाच्या मालाला वाढती मागणी येत आहे. त्यामुळे चालू आर्थिक वर्षांत मागील वर्षाच्या मानाने ह्या मालाची आधिक निर्यात होईल. भारताच्या दालनांत मांडण्यांत आलेल्या मालाची दररोजची विक्री कधी कधी २० हजार डॉलर्स इतकी होते. नैस-र्गिक व कृत्रिम मूल्यवान खडे, लोकरी गालीचे, नक्षी काढलेले सुती कापड, हस्तीदंताच्या वस्तू, जरीचा माल, इत्यादि मालाला विशेष मागणी आहे.


# अन्नधान्याची टंचाई दूर करण्यासाठी एकरी उत्पादन वाढवा

**खरीप पिकांच्या कामाचा हा महत्त्वाचा काळ होय. तेव्हा, खरीप पीक उत्पादन मोहीम यशस्वी करण्यासाठी ही कामे योग्य वेळीच करा:—**

**भात :** भाताच्या रोपांची ओळीत लागवड करा. तुडातील अंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे ९" × ९" अथवा ९ इंच × ६ इंच ठेवा. लागवडीचे वेळी एकरी ११२ पौंड सुपर-फॉस्फेट व १०० पौंड अमोनियम सल्फेट ही खते द्या.

**ज्वारी :** पिकाची विरवणी करा.
भांगलणी व कोळपणी ( निंदण व डवरण ) करून तणांचा नाश करा.
पिकास एकरी १०० पौंड अमोनियम सल्फेट किंवा दुसरे नत्रयुक्त वरखत म्हणून द्या.

**बाजरी :** पिकाची विरवणी व जरूरीप्रमाणें भांगलणी-कोळपणी करा.
पेरणीचे वेळी पिकास अमोनियम सल्फेट दिले नसल्यास कोळपणीचे वेळी एकरी १०० पौंड अमोनियम सल्फेट द्यावे.

**नागली :** रोप तयार होत असल्यास निगा राखा.
तयार झालेल्या रोपाची लावणी करा व पिकास एकरी १२५ पौंड सुपर फॉस्फेट व ५० पौंड अमोनियम सल्फेट द्या.

**खरीप पिकांची योग्य ती जोपासना करा.**

## शहरांकडे धांवणारा माणसांचा ओघ

चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत रोजगार आणि कामगार ह्यांच्याकडे कोणत्या दृष्टीनें पहाण्यांत यावें यासंबंधीं नियोजन समितींत चर्चा करण्यांत आली. अलीकडील कांहीं वर्षांत ग्रामीण भागांतून शहरांकडे माणसांचा ओघ वाढत्या प्रमाणांत वहात आहे. त्यामुळें शहरांतील रोजगारीचा प्रश्न अधिकच बिकट होत चालला आहे. खेड्यांत उद्योगधंदे काढून, वीजपुरवठा व इतर सोयी उपलब्ध करून हा ओघ कमी करतां येईल असा अभिप्राय समितीनें व्यक्त केला आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या आरंभीं सांचलेल्या बेकारांचा आंकडा १·२६ कोटी असेल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या कार्यक्रमांत २·३ कोटी रोजगार उपलब्ध करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे.

## सूर्यावरील स्फोट आणि हृदयविकार

मँचेस्टर येथें ब्रिटिश मेडिकल असोसिएशनच्या वार्षिक परिषदेस गेलेल्या एका फ्रेंच हृदयविकार तज्ज्ञानें असें मत व्यक्त केले आहे कीं सूर्यावरील स्फोट आणि हृदयविकाराचे झटके ह्या दोन घटनांत निश्चितपणे संबंध आहे. सूर्यावरील स्फोट ज्या मानाने कमी-अधिक जोराचे असतील त्या मानाने हृदयविकाराचे झटके उशिरा अगर जलद येतात असे आढळून आले आहे. ह्या बाबतींत युरोपमधील चार वेधशाळांनीं जमविलेली सूर्यावरील स्फोटांची माहिती आणि २४ ते ४८ तासांत पॅरिसमधील व्यक्तींना आलेले हृदयविकाराचे झटके ह्यांची सांगड घालण्यांत आली आहे. सूर्यावरील स्फोटांमुळें वातावरणांत कमी-अधिक तीव्रतेचें विश्वकिरण उद्रेक पावतात आणि त्यांचा पृथ्वीवरील जीवजातींवर परिणाम घडून येतो.

## टेलिफोनचीं बिलें करण्यासाठी यंत्राचा उपयोग

कलकत्ता येथील टेलिफोन्सची बिले तयार करण्यासाठी यांत्रिक सोय करण्यांत आली आहे. ह्या पद्धतीमुळें ८० हजार बिलें तयार करण्यासाठी अवघे तीन दिवस लागतील. सध्यां बिलें तयार करण्यासाठी कित्येक आठवडे लागतात. कलकत्त्यामधील टेलिफोन्सचें जाळें हें भारतांत सर्वांत मोठें असून त्यांत १ लाख टेलिफोन्सचा समावेश आहे. गेल्या कांहीं वर्षांत कलकत्त्यामधील टेलिफोन्सची संख्या वाढत चालल्यामुळें बिलें तयार करणें आणि तीं वसूल करणें अवघड होत चाललें होतें. नव्या व्यवस्थेमुळें हे काम सुकर तर होईलच; शिवाय टेलिफोन्सच्या व्यवस्थेबद्दल आंकडेवारी माहितीहि सहज मिळू शकेल.

## केळ्यांच्या निर्गतीचा परिणाम

महाराष्ट्र को. मार्केटिंग सोसायटी, जळगांव, नें ८·४६ लक्ष रुपयांची केळीं मुंबईहून निर्यात केली. त्यांतली बहुतेक 'वाटेंतच नासून गेली आणि आयात करणाऱ्या इटॅलिअन्सनीं तीं घेण्याचें नाकारलें. अखेर, मोठ्या मिनतवारीनें, त्यांनी २६,००० रु. ची केळी घेतली. नासलेल्या केळ्यांचा नाश करण्याची अडचण उपस्थित झाली; ती जंगलांत नेऊन जाळून टाकावी, असें ठरलें त्याला १ लक्ष रु. पर्यंत खर्च आला! ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे मुंबईमधल्या केळ्यांचा भाव भयंकर वाढला.

## युनिट ट्रस्टचे युनिट्स १४ ऑगस्टपर्यंत दर्शनी किंमतीस मिळतील

१ जुलै रोजीं युनिट ट्रस्टच्या युनिटची विक्री सुरू झाली. २२ जुलै अखेर ४०,००० अर्ज आले असून आणखी अर्ज दररोज येत आहेत. बहुतेक अर्ज १०० रु. ते १,००० रु. चे आहेत. विक्रीची प्राथमिक मुदत वाढवून ती आतां १४ ऑगस्ट-पर्यंत केली आहे. त्या तारखेपर्यंत प्रत्येक १० रु. चा युनिट १० रु. लाच मिळूं शकेल. सध्यांच्या योजनेप्रमाणें दोन अगर अधिक व्यक्तींना "जॉइंट आणि सर्व्हायव्हर/सर्व्हायव्हर्स" ह्या प्रकारें युनिट्स धारण करतां येतात; "आयदर ऑर सर्व्हायव्हर/एनीवन ऑर सर्व्हायव्हर्स" ह्याप्रमाणें धारण करण्याची सवलत आतां देण्यांत येत आहे. त्याप्रमाणें अर्जदारानें अर्जावर ४ थ्या कॉलमखाली लिहिलें पाहिजे. दुसऱ्या एका दुरुस्तीच्या अन्वयें, १९६० च्या सोसायटीज रजिस्ट्रेशन कायद्याखाली नोंदलेल्या सोसायट्यांना युनिट्स खरीदता आणि धारण करतां येतील. युनिट सर्टिफिकिटें एक-दोन महिन्यांत अर्जदारांच्या पत्त्यावर धाडली जातील; अर्जदारांनीं आपल्या पावत्या युनिट ट्रस्टच्या कचेरीकडे न पाठवता सर्टिफिकिटें मिळेपर्यंत स्वतः जवळच ठेवावयाच्या आहेत.

## ब्रिटिश मदतीचें स्वरूप

१९६२-६३ सालीं ग्रेट ब्रिटननें अविकसित देशांना २०० कोटी रुपयांची मदत केली, पण त्यामुळें त्याला ५० कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळाला, असा ओव्हरसीज डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूटचा निष्कर्ष आहे. ही मदत म्हणजे व्याज असलेली कर्जे असतात आणि ब्रिटिश मालाच्या निर्गतीशीं ती जोडलेली आहेत, असें ५०% मदतीचें स्वरूप आहे. "वाढदिवस आणि नाताळ ह्या प्रसंगीं भेटकार्डे पाठविण्यावर इंग्रजांचा खर्च होतो, त्यापेक्षा ह्या मदतीची रक्कम कमीच भरेल."

## अमेरिकन बँकांची नोकर-आराधना

अमेरिकन बँका नोकरवर्ग आकृष्ट करण्यासाठी, त्याला संतुष्ट ठेवण्यासाठी, पगाराव्यतिरिक्त अनेक गोष्टीं त्याच्यासाठी करीत असतात: कॉफीसाठी सुट्टी, जेवणासाठी सोयीं, फुकट जेवण, नाताळच्या वेळीं देणग्या, पिकनिक पार्ट्या, वनभोजनाच्या सोयीं, वार्षिक सुट्या, मोफत वैद्यकीय तपासणी, आजारपणाचा विमा, मुलांच्या शिकण्याची व्यवस्था, नोकराच्या दर्जाप्रमाणें बोनस (मोटार, मोटारसायकल, सायकल इ.!)

## दूध देणारें झाड

दक्षिण अमेरिकेंतील अँडीज पर्वतांत गायीच्या दुधासारखा पांढरा स्राव देणारें एक झाड आहे. ह्या झाडाच्या सालींत चिरा दिला तर त्यांतून गायीच्या दुधासारखा द्रव पदार्थ बाहेर पडतो. स्रावाचा उपयोग करून दक्षिण अमेरिकेंत कॉफी, आइसक्रीम इत्यादि पदार्थ बनविण्यांत येतात. रसाची चव आणि घटक द्रव्यें गायीच्या दुधासारखींच आहेत. दक्षिण भारतांत सालेम जिल्ह्यांत ह्या झाडाची प्रायोगिक लागवड करण्याचा विचार चालू आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (ए. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.